(महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग-६अ करिता)

महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं/३-अ/पदो/ पोउपनि बिसं(अभि.) ते पोनि बिसं(अभि.) /१४/२०२५ मुंबई दिनांक :- ३०/०३/२०२६

**वाचा :-** १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/ कार्यासन १२, दिनांक ०१/०८/२०१९
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीबीसी२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७/०५/२०२१ व
३. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना दिनांक १४/०७/२०२१

**-: आदेश :-**

उपरोक्त संदर्भ क्र. २ मध्ये नमूद केलेल्या दि. ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयानुसार पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि. २५/०५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने भरण्यात येत असून, दि. २५/०५/२००४ नंतर शासन सेवेत रुजु झालेल्या अधिका-यांना त्यांच्या मुळ सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात येत आहे. संदर्भ क्र. १ मधील शासन निर्णयानुसार विभागीय पदोन्नती समितीने पोलीस उप निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) यांना पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) या पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्रापात्रता तपासून सन २०२५-२६ ची पुरवणी निवडसूची तयार केली आहे. सदर निवडसूचीमध्ये पात्र एकूण १२ पोलीस उप निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) यांना पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) या पदावर पदोन्नती देण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दि.१४/०७/२०२१ मधील नियमांप्रमाणे महसूल विभाग वाटप करण्यात आला आहे.

२. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२ न नुसार पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांना प्रदान असलेल्या अधिकारांचा वापर करुन खालील पोलीस उप निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) यांना, त्यांनी कार्यभार ग्रहण केलेल्या दिनांकापासून **" पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) "** (सुधारीत पदनाम पोलीस निरीक्षक, पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञान विभाग) या पदावर पदोन्नतीवर त्यांची पदस्थापना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या रकाना क्र. ५ मधील घटकात करण्यास पोलीस आस्थापना मंडळ क्र. २ यांनी मान्यता दिली आहे. :-

| अ. क्र. | पोलीस उपनिरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) यांचे नांव | सध्याची नेमणूक | वाटप महसुल विभाग | पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) पदावर पदोन्नतीवरील नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | सतिश दादासाहेब शिळीमकर | यवतमाळ | पुणे | संचालक कार्यालय, पुणे |
| २. | सुनिल परशुराम बांगर | परभणी | पुणे | संचालक कार्यालय, पुणे |
| ३. | गजानन शंकर नाईक | नवी मुंबई | कोकण २ | मुंबई शहर |
| ४. | नितीन लक्ष्मण चंद्रात्रे | पालघर | कोकण १ | पालघर |
| ५. | सुनिल दत्तात्रय जोशी | मिरा भाईदर वसई विरार | कोकण २ | मुंबई शहर |
| ६. | रमाकांत गुणवंत चिकणे | पिंपरी चिंचवड | पुणे | संचालक कार्यालय, पुणे |
| ७. | कृष्णा सदाशिव कुबल | नवी मुंबई | कोकण २ | मुंबई शहर |
| ८. | आनंद कृष्णाजी दामले | टाणे शहर | नागपूर | नागपूर शहर |
| ९. | सुदर्शन पद्माकर जोशी | म.पो.अ.,नाशिक | नाशिक | नाशिक शहर |
| १०. | सुनिल दत्तात्रय अरगडे | लोहमार्ग, मुंबई | पुणे | पिंपरी चिंचवड |
| ११. | विश्वास पांडुरंग रसाळ | पिंपरी चिंचवड | पुणे | लोहमार्ग, पुणे |
| १२. | किरण भगवान पाटील | पुणे शहर | छत्रपती संभाजीनगर | बीड |

३.	सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १५ डिसेंबर २०१७ व दि. ३०/०८/२०१८ च्या शासन निर्णयातील तरतुदीचे अवलोकन व्हावे. त्यानुसार उपरोक्त अधिका-यांना विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीनंतर जर त्यांच्याविरुध्दच्या प्रलंबित/ प्रस्तावित विभागीय / न्यायालयीन कार्यवाहीच्या अनुषंगाने

(१)	शिक्षा प्रस्तावित/ चालू झाली असल्यास,
(२)	विभागीय चौकशी चालू झाली असल्यास,
(३)	गुन्हा दाखल / दोषारोप मा. न्यायालयात दाखल झाले असल्यास,
(४)	निलंबित असल्यास इत्यादी प्रकरणात कार्यमुक्त न करता प्रकरणाचा सविस्तर अहवाल या कार्यालयास पाठवावा व पुढील आदेशाची वाट पहावी.

४.	सदरील आदेश मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अंतीम आदेशांच्या अधिन राहून व दिनांक ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयाच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

५.	मा. न्यायालय / महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण / निवडणूक आयुक्त यांचे आदेशाचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

६.	सदर पदोन्नती आदेशामधील पोलीस उप निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) हे जर आदेशामध्ये नमूद केलेल्या घटकामध्ये सध्या कार्यरत नसतील तर, ते ज्या घटकात कार्यरत आहेत, त्या घटक प्रमुखांनी त्यांना पदोन्नतीच्या घटकात हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे, व तसे हया कार्यालयास न चुकता कळवावे.

**७.	पदोन्नती झालेले अधिकारी यांचे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी अभिनंदन केले आहे.**

**सदानंद दाते**
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रति,**

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई / नवी मुंबई / मिरा भाईंदर वसई विरार / पिंपरी चिंचवड / ठाणे शहर / पुणे शहर / नागपूर शहर / नाशिक शहर / लोहमार्ग, मुंबई
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग, म. राज्य, पुणे
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक
अपर पोलीस आयुक्त, पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन विभाग, बृहन्मुंबई
पोलीस अधीक्षक, यवतमाळ / परभणी / पालघर / लोहमार्ग, पुणे / बीड
पोलीस अधीक्षक, बिनतारी संदेश, पश्चिम विभाग, पुणे / मध्य विभाग, छ. संभाजीनगर / पुर्व विभाग, नागपूर

**प्रत सस्नेह सादर,**

अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र शासन, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई- १/ महाराष्ट्र राज्य, नागपूर - २
अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई

**प्रत, :-**

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पो.म.सं. कार्यालय, मुंबई
२.	यांनी सदरचे आदेश पोलीस उपनिरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) यांना पोलीस निरीक्षक, बिनतारी संदेश (अभियांत्रिकी) ( PSI W/L (Engg.) to PI W/L (Engg.) Promotion) या पदावर पदोन्नती या विषयाखाली पोलीस महासंचालक कार्यालयाच्या www.mahapolice.gov. in या संकेतस्थळावर १ महिन्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत.
कार्यासन अधिकारी, का.क्र. २/ ०९/ ११/ ११-अ/ ३६/ ४०

**( सुप्रिया पाटील यादव )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकरिता.